YoATR

## व्यवस्थापन परिषदेची दिनांक २३ मे, २०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषद दिनांक २३ मे, २०१८ रोजीच्या बाबी | व्यवस्थापन परिषद दिनांक २३ मे, २०१८ बाबींवरील ठराव | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | दिनांक २५ एप्रिल २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर. | असा ठराव करण्यात आला की, दि. २५ एप्रिल २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तातील बाब क्रमांक १७ वगळून इतिवृत्त मंजूर करण्यात आले.<br><br>बाब क्र. १६ : सदर बाब माहितीसह पुनश्च: सादर करण्यात यावी असा ठराव पारित झालेला होता. इतिवृत्त मंजूर करताना बाब क्र १६ बाबत ठराव करण्यात आला की,<br>१) मे. जाधव ॲन्ड कंपनी (C.A) यांनी सादर केलेला अंतरिम अहवाल स्विकारण्यात यावा व त्यानुसार वित्त व लेखा विभाग आणि संलग्नता विभागाने महाविद्यालयाकडून संलग्नता शुल्क व दंडाची रक्कम वसुल करण्याची कारवाई सुरू करावी.<br>२) वसुलीच्या अनुषंगाने मे. जाधव ॲन्ड कंपनीला अंशत: मोबदला देण्यात यावा.<br>३) मे. जाधव ॲन्ड कंपनीला दि.३० सप्टेंबर २०१७ ते ३१ ऑगस्ट २०१८ असे एक वर्षाच्या कालावधीकरिता काम करण्याची मुदतवाढ देण्यात यावी. | पारित झालेले ठराव संबंधित विभागास पाठविण्यात आले.<br><br>कार्यकारी प्राधिकरणे विभागाने पत्र क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०१८-१९/२२१ दि.१३/८/१८ अन्वये वित्त व लेखा विभाग तसेच संलग्नता व मान्यता विभाग यांना पुढील कार्यवाहीसाठी ठराव पाठविला आहे. कार्यवाही सुरू आहे. |
| २ | दिनांक ११ व २४ जानेवारी, २०१८, ५ व १६ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेचा कार्यवाही अहवाल सादर. | असा ठराव करण्यात आला की, दि.११ व २४ जानेवारी २०१८, ५ व १६ फेब्रुवारी २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत इतिवृत्तवरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | नोंद घेण्यात आली. |
| ३ | शिवजयंती उत्सव सप्ताह मुंबई विद्यापीठ व सर्व संलग्नित महाविद्यालयांत साजरा करण्याबाबत. | असा ठराव करण्यात आला की, शिव जयंती उत्सव सप्ताह मुंबई विद्यापीठ व सर्व संलग्न महाविद्यालयात पुढील वर्षापासून साजरी करण्यात यावी तसेच सप्ताहाच्या स्वरूपाबाबत प्रारूप ठरविण्यासाठी समिती गठीत करण्यात यावी व समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | संलग्नता विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीएम/२०१८-१९/७१५ दि. ४ जुलै, २०१८ नुसार समिती गठीत केली आहे. पुढील कार्यवाही सुरू आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदर समिती, सप्ताहामध्ये विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापक यांच्यासाठी शैक्षणिक दृष्टीने आवश्यक कार्यक्रम तसेच सामाजीक बदल घडविण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्र, कार्यशाळा इत्यादीचा समावेश करून सप्ताहाचे स्वरूप ठरवेल. समितीने तीन महिन्यात अहवाल सादर करावा. सदर अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवण्यात यावा. | |
| ४ | विद्यापीठातील गटविमा योजनेत समाविष्ठ न होण-या शिक्षकेतर कर्मचा-यांना वैद्यकीय भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव | असा ठराव करण्यात आला की, विद्यापिठातील गट विमा योजनेत समावेश न होणाऱ्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना, वैद्यकीय भत्ता देण्याबाबत सविस्तर प्रस्ताव खालील माहितीसह पुन:श्च सादर करावा :-<br>१) इन्श्युरन्स कंपनी कोणती आहे ?<br>२) गटविमा योजनेची माहिती देण्यात यावी.<br>३) सदर योजना कोणत्या वर्षापासून सुरू झाली ?<br>४) सध्या प्रती कर्मचारी रूपये ११ हजार ५०० एवढी रक्कम आहे. ती व्यवस्थापन परिषदेत पारीत झाली आहे का?जेव्हा गट विमा योजना सुरू झाली तेव्हा प्रती कर्मचारी रक्कम किती होती ? त्यानंतर प्रत्येक वर्षी रक्कम किती होती.<br>५) जेव्हा ही योजना लागू केली तेव्हा कर्मचाऱ्यांची अनुमती घेतली होती का? ठरावाची प्रत जोडण्यात यावी.<br>६) कर्मचाऱ्यांना यापूर्वी देण्यात येणारा वैद्यकीय भत्ता कधीपासून बंद झाला व तेव्हा तो किती होता ?<br>७) कर्मचाऱ्यांचे गटविमा योजनेला नकार देण्याचे कारण काय आहे?<br>८) जेव्हा ही योजना लागू केली तेव्हा कर्मचाऱ्यांची अनुमती घेतली होती का? ठरावाची प्रत जोडण्यात यावी.<br>९) विद्यापीठाने ९४ लाख देण्याचे ठरविले याबाबत व्यवस्थापन परिषदेचा ठराव झाला आहे काय?<br>१०) प्रति कर्मचारी किती रक्कम विद्यापीठ देते व कर्मचाऱ्यांच्या पगारातून किती रक्कम घेतली जाते. किती रक्कमेचा विमा प्रति वर्षी मिळतो व किती व्यक्तिंसाठी मिळतो? | आस्थापना विभागाने (२/४) यांनी पत्र क्र. इएसटी/आयसीडी/२०१८-१९/१५६ दिनांक २ जुलै, २०१८ नुसार आणि पत्र क्र. इएसटी/आयसीडी/२०१८-१९/१२५९ दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ नुसार वित्त व लेखा विभागाशी पत्र व्यवहार केला आहे. वित्त व लेखा विभागाकडून माहिती प्राप्त झाली असून दोन्ही विभागांची माहिती एकत्रितपणे सादर करण्यात येईल.<br><br>बाब क्र.४ मधील मुद्दा क्र. ४, ९, १० बाबत पत्र क्र.FAO/ICD/2018-19 dt. 18/8/18 नुसार वित्त व लेखा विभागाने कार्यवाही बद्ल कळविले आहे. कार्यवाही सुरू आहे. |
| ५ | The Memorandum of agreement and its addendum between the Department of German of the University of Mumbai and the Department of Social and Cultural Anthropology of the Goethe University Frankfurt, for consideration. | It was resolved that, the MOU and its addendum between the University of Mumbai, (Department of German) and the Department of Social and Cultural Anthropology of the Goethe University Frankfurt on Educational and Scientific Co-Operation, be accepted. | विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने पत्र क्र. APD/ICD/682/212/2018 dated 26th June, 2018 नुसार जर्मन विभागास ठरावाची प्रत पाठवली. सदर सामजंस्य करार स्वाक्षरित |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | झाला आहे. |
| ६ | Draft MOU between Department of Biotechnology University of Mumbai and Xcelris Labs Ltd. for consideration of the Management Council. | It was resolved that, the MOU between University of Mumbai (Department of Biotechnology) and Xcelris Labs Limited to propose a collaborative project {under the call for proposal on Antimicrobial Resistance (AMR) announced by the Biotechnology Industry Research Assistance Council (BIRAC), a Government of India Enterprise under Department of Science and Technology} be accepted. | १. विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने पत्र क्र. APD/ICD/682/197/2018 dated 27th June, 2018 नुसार ठराव संबंधित विभागास पाठविला.<br>आणि<br>२.जैवतंत्रज्ञान विभागाने पत्र क्र. MOM/Biotech/448/2018 dt. 14/8/18. नुसार कळविले आहे की, ऑक्टोबर, २०१८ मध्ये अंतिम निकाल घोषित होणार असून नंतर सामजंस्य करार स्वाक्षांकित करून पुढील कार्यवाही करण्यात येईल. कार्यवाही सूरू आहे. |
| ७ | विद्वत परिषद ५/०५/२०१८ रोजीच्या सभेमध्ये अनुक्रमे बाब कमांक अन्वये 3.4, 3.8, 3.9, 3.11, 3.12, 4.15, 4.16, 4.19, 4.21, 4.23, 4.29, 4.40, 4.41, 4. 50, 7.1, 7.2, 7.3, 7.4, 7.5, 7.6, 7.7 अणि 8.1 पारित केलेले ठराव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. | असा ठराव करण्यात आला की, दि. ५ मे, २०१८ रोजी विद्वत परिषदेमध्ये बाब क. ४.१५, ४.१६, ४.१९, ४.२१, ४.२३, ४.२९, ४.४०, ४.४१, ४.५०, ७.१, ७.२, ७.३, ७.४, ७.५, ७.६, ७.७, ८.१ अन्वये करण्यात आलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या.<br><br>असाही ठराव करण्यात आला की, बाब क. ३.४, ३.८, ३.११, या अन्वये केलेल्या शिफारशींवर निर्णय हा व्यवस्थापन परिषदेमध्ये श्री. दिपककुमार मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या महाविद्यालय व अभ्यासक्रम बंद करण्याबाबतच्या | १. विद्याविषयक प्राधिकरण विभागाने पत्र क. A.A./ICD/2018-19/215,217 dated 22nd June, 2018 नुसार पदवीपूर्व विभाग आणि गरवारे इंस्टिटयुट ऑफ करिअर ॲन्ड एज्युकेशन डेव्हलपमेंट या विभागांना पुढील कार्यवाही करण्यासाठी कळविले आहे.<br>आणि<br>बाब क्र. ८.१ च्या बाबत विद्याविषयक प्राधिकरणे विभागाने पत्र क्र.AA/ICD/2018-19/107 dt. 5/5/2018 नुसार परिपत्रक काढण्या बाबत पदवीपूर्व विभागास कळविले आहे. पदवीपूर्व विभागाने परिपत्रक No.UG/03 of 2018-19 dt 8/5/2018 नुसार arrangement of terms for the courses बाबत परिपत्रक निर्गमित केले आहे.<br><br>संलग्नता विभागाचे पत्र क. No.Aff/ICM/2018-19/1214 Dated 21 Augst, 2018 नूसार श्री दिपक कुमार मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून समितीची बैठक २८ ऑगस्ट, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवण्यात यावा. | २०१८ रोजी झाली. पुढील कार्यवाही सुरू आहे. |
| | | बाब क. - ३.९ बाबत असा ठराव करण्यात आला की, सदर महाविद्यालयाची विद्यापीठाकडे कोणतीही शुल्काची रक्कम बाकी नाही असे प्रमाणप्रत्र संलग्नता विभागाने वित्त व लेखा विभागाकडून माहिती घेऊन दयावे व सदर बाब प्रमाणपत्रासहित पुन:श्च सादर करावी. | संलग्नता विभागाने पत्र क. संलग्नता/आय.सी.डी./२०१८-१९/१२६ दि. ३० ऑगस्ट, २०१८. नुसार नरसी मोनजी कॉलेज ऑफ कॉमर्स अन्ड ईकॉनॉमिक्स, यांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ चे वार्षिक शुल्क ७२,००० व संलग्नता शुल्क २,८४००० तसेच शैक्षणिक वर्ष २०१४-१५ चे संलग्नता शुल्क ४,२८,००० असे एकूण ७,८४,००० इतकी रक्कम ७ दिवसात भरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. |
| | | On Item no. 3.12 it was resolved that the University will write a letter to the Secretary of Higher Education requesting their guidance with respect to acceptance and execution of the UGC Regulation dated 12th February, 2018 for granting autonomous status, as the University has received some proposals for granting of autonomous status from colleges. | संलग्नता विभागाचे पत्र क्र Aff./ICD/18-19/2498 दि. 31st Jan, 2019 नुसार श्री. के. ठाकूर महाविद्यालय, कांदिवली यांना Autonomous Status प्रदान केल्याचे पत्र पाठविले आहे. |
| | | In the meanwhile letter be sent to the colleges who have sent proposals for the autonomous status that the University is waiting for the decision from the Government of Maharashtra in respect of the execution of the UGC Guidelines.<br>It was also resolved that the Vice-Chancellor be authorized to execute and take decision when the university will receive notification or guidance from the State Government. | संलग्नता व मान्यता विभागाने पत्र क्र. Aff/ICD/18-19/1189 dt. 18/8/18 नुसार कळविले आहे की, शासन निर्णय दिनांक २८ मे, २०१८ अन्वये स्वायत्ततेसंबंधी यु.जी.सी. रेग्युलेशन्स १२ फेब्रुवारी, २०१८ स्विकारण्यात आले आहे. |
| | | बाब क्र. ४.५० - च्या बाबत असा ठराव करण्यात आला की, सदर महाविद्यालयाकडून B.voc Course in Traval and Tourisum या अभ्यासक्रमाकरिता शुल्क मिळाल्याची पावती व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावी. | |
| ८ | Item for approval of Management Council of the university of Mumbai to sanction for MOU between Bank of Maharashtra Pune & University of Mumbai's Vijayalakshmi Vishwanath Dalvie College, Talere. | It was resolved that the MOU between the Bank Of Maharashtra, Pune and University of Mumbai's Vijayalakshmi Vishwanath Dalvie College, be accepted. | विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने पत्र क. APD/ICD/682/211/2018 dated 6th July, 2018 नुसार कार्यवाही झाल्याचे कार्यकारी प्राधिकरणे विभागास कळविले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे यांनी पत्र क्र.वि.वि.द.महा. /२०१८-१९/१८९ दि. १४/८/१८ नुसार माहिती कळविली आहे. त्यानुसार दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता व्यवस्थापन परिषदेच्या दालनामध्ये सामंजस्य करारावर स्वाक्ष-या झाल्या. |
| ९ | TO undertake coallaborative research project & launching of Master's Degree in Micro Master Programmes in Data Science as envisioned in tripartite agreement (Draft) between Wadhwani Institute of Artifical Intelligence(WIAI), University of Mumbai(UOM) and Government of Maharashtra(GOM) by sharing space in IT park building of University at Vidyanagari Campus with the provision of employing 3 faculties & enrolment of 60 students for the said Masters Programmes | After due discussion and deliberation on the captioned matter, it was resolved that permission to create one professor cadre and two S.R.F cadre positions for Master Degree and Micro Master Program in Data Science, be granted. | १.विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने पत्र क. APD/ICD/68 /188/2018 dated 26th June, 2018 नूसार विभाग प्रमुख यांना ठरावाची प्रत पाठविली आहे.<br>२.संगणकशास्त्र विभागाने पत्र क. UDCS/22/18-19/161 dt. 13/8/18 नुसार वाधवानी इन्स्टीटयूट ऑफ आर्टीफिशियल इटेंलिजन्स अंतर्गत दोन सहायक प्राध्यापकांची नेमणूक केली आहे. |
| १० | महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई या विद्यापीठास कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्यासाठीची बाब सादर | असा ठराव करण्यात आला की, कलिना येथे जागा उपलब्ध नसल्याने महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई यांना कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देता येणार नाही. | विद्यापीठ क्षेत्र विकास विभागाने पत्र क. Engg./ICD/2018-19/375 ३५<br><br>आणि सीडीयु/२२९/४३५/२०१८ दि. ११ जुलै २०१८ नुसार व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई यांस मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात जागा उपलब्ध करून देता येणार नाही असे उच्च व तंत्रशिक्षण विभागास कळविले आहे. |
| | चर्चेच्या अनुषंगाने | १) चर्चेच्या अनुषंगाने शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना यांच्या दि. ३ मे, २०१८ रोजीच्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्याबाबत सविस्तर अभ्यास करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. | प्रशासकीय स्तरावर कार्यवाही सुरू आहे. |
| | | २) श्री. दिपककुमार मुकादम यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयावर असा ठराव करण्यात आला की, जेव्हा सदस्यांना कार्यसूची पाठविण्यात येते तेव्हा कार्यसूचीत खालीलप्रमाणे वाक्य लिहिण्यात यावे. "व्यवस्थापन परिषदेत सादर केलेल्या | सदर ठरावाप्रमाणे व्यवस्थापन परिषदेची कार्यसूची पाठवितांना सदर वाक्य लिहिण्यात येते. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कार्यसूचीवरील सर्व बाबींवर कुलगुरूंची स्वाक्षरी झालेली आहे आणि याबाबत सर्व मुळ कागदपत्र हे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना पाहण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत पडताळणीसाठी उपलब्ध करून देण्यात येतील." | |
| | | ३) चर्चेच्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेची कार्यसूची ही सदस्यांना आठ दिवस अगोदर पाठविण्यात यावी व पुढील बैठकीचे इतिवृत्त हे बैठकीच्या वेळीच बनविण्यात यावे. | सर्व सदस्यांना कार्यसूची आठ दिवस अगोदर पाठविण्यात येते.<br>इतिवृत्त बैठकीच्या वेळीच बनविण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. |

टिप - व्यवस्थापन परिषदेत सादर केलेल्या कार्यवाही अहवालाबाबत संबंधित विभागाकडून प्राप्त झालेली मुळ कागदपत्रे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना पडताळणीसाठी आवश्यक असल्यास उपलब्ध करून देण्यात येतील.

मुंबई - ४०० ०३२
४ सप्टेंबर, २०१८.

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)